# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. : प्रशा/व्य.मं./२०१६/ २५/१०/२०१६

**कार्यवृत्तांत**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची सभा गुरूवार दि. ०६ ऑक्टोबर २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दीपक ज. टिळक, कुलगुरु (अध्यक्ष)
२. डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक, अधिष्ठाता, आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये अभ्यासमंडळ
३. डॉ. मा. चिं. दीक्षित, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
४. डॉ. हेमंत अभ्यंकर, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
५. डॉ. श्रीपाद भट, प्राध्यापक प्रतिनिधी
६. डॉ. माधवी रेणावीकर, सहयोगी प्राध्यापक प्रतिनिधी
७. श्रीमती सरीता साठे, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी
८. सौ. प्रणति टिळक, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी.
९. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव, (सचिव)

डॉ. बा. शि. दामले व डॉ. श्री. ग. बापट हे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.

१) व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि.१२ ऑगस्ट २०१६ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६४**

कार्यवृत्तांत संमत करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

२) शासनमान्य शिक्षक व शिक्षकेतर पदांसाठी झालेल्या मुलाखतींतून निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांबद्दल माहिती देणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६५**

**शिक्षकेतर पदे :**

१. मुख्य लेखपाल (१ पद - खुला संवर्ग )
निवड समितीने सुचविलेल्या सौ. मृणाल संजय विभुते यांच्या मान्यता देण्यात आली.

२. सहाय्यक कुलसचिव (१ पद - खुला संवर्ग )
मुलाखतीच्या वेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, संगणकाचे ज्ञान, प्रत्यक्ष कामाचा अनुभव व मुलाखतीच्यावेळची कामगिरी लक्षात घेता या पदासाठी एकही समाधानकारक उमेदवार न मिळाल्यामुळे या पदासाठी पुन्हा जाहिरात देण्याच्या शिफारसीस मान्यता देण्यात आली.

**शिक्षकीय पदे :**

**प्राध्यापक :**

१) अर्थशास्त्र (१ पद – SC)

सदर पदासाठी एकच अर्ज प्राप्त झाला व सदर उमेदवार पात्र नसल्याने, या पदासाठी मुलाखती घेतल्या नाहीत.

**सहयोगी प्राध्यापक :**

१) समाजशास्त्र विभाग (१ पद – खुला संवर्ग )

निवड समितीने सुचविलेल्या डॉ. विशाल गुलाबराव जाधव यांच्या नावास मान्यता देण्यात आली.

**सहाय्यक प्राध्यापक :**

१) आयुर्वेद विभाग (१ पद – खुला संवर्ग )

निवड समितीने सुचविलेल्या सौ. मनोजा अभिजीत जोशी यांच्या नावास मान्यता देण्यात आली. सदर निर्णयाच्या वेळेस व्यवस्थापन मंडळाचे सचिव व आयुर्वेद विभागप्रमुख डॉ. अभिजीत जोशी हे सभागृहाबाहेर गेले.

२) राज्यशास्त्र विभाग (१ पद – VJNT1)

निवड समितीने सुचविलेल्या डॉ. ओंकार नरेंद्र केणे यांच्या नावास मान्यता देण्यात आली. सदर

३) इतिहास विभाग (१ पद – ST)

मुलाखतीच्या वेळी उपस्थित असलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, प्रत्यक्ष कामाचा अनुभव व मुलाखतीच्यावेळची कामगिरी लक्षात घेता या पदासाठी एकही समाधानकारक उमेदवार न मिळाल्यामुळे या पदासाठी पुन्हा जाहिरात देण्याच्या शिफारसीस मान्यता देण्यात आली.

३) लीडस् विद्यापीठ, यु.के येथील M.Sc. इन मार्केटिंग मॅनेजमेंट पदवीला M.B.A. समकक्ष ठरविण्याच्या विनंतीपत्राबाबत निर्णय घेणेबाबत.

## ठराव : व्य.मं.२०१६–१६६

लीडस् विद्यापीठ, यु.के येथील M.Sc. इन मार्केटिंग मॅनेजमेंट पदवीला M.B.A. समकक्ष ठरविण्याच्या विनंतीस मान्यता देण्यात आली (सोबत माहितीकरीता प्रत जोडली आहे)

यानंतर अशा तऱ्हेचे कोणतेही प्रस्ताव आल्यास यु.जी.सी. नियमांनुसार व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्यात यावे व मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४) एम. ए. फिलॉसॉफी (रेग्युलर व एक्स्टर्नल) फी स्ट्रक्चर ला मान्यता देणेबाबत.

## ठराव : व्य.मं.२०१६–१६७

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

५) एम.ए.(मराठी/ इंग्रजी/हिंदी) अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्रांतील संपर्कसत्र योजने संदर्भात निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६८**

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

६) बी.बी.ए. अभ्यासक्रमांतर्गत Disaster Management हा नवीन विषय सुरू करण्याबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१६९**

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

७) बी.बी.ए.- रेग्युलर या अभ्यासक्रमाची सध्याची ६० विद्यार्थी क्षमता वाढवून १२० करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७०**

बी.बी.ए.- रेग्युलर या अभ्यासक्रमाची सध्याची ६० विद्यार्थी क्षमता वाढवून ९० करण्यास मान्यता देण्यात आली.

८) एम.बी.ए - हॉस्पिटल व हेल्थ केअर मॅनेजमेंट या अभ्यासक्रमात समाविष्ट असणारा ट्रेनिंग अॅन्ड डेव्हलपमेंट हा विषय वरील अभ्यासक्रमास धरून नसल्याने सदर विषय अभ्यासक्रमातून काढून टाकण्यास विभागाने दिलेल्या विनंतीअर्जाबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७१**

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

९) संस्कृत विभागातील सर्व अभ्यासक्रमांचे अध्यापन या वर्षी लवकर सुरू झाल्याने सदर अभ्यासक्रमांच्या परीक्षा ८ नोव्हेंबरपासून सुरू करणे व पुढील सत्रांच्या परीक्षा एप्रिल महिन्यात घेण्यासंदर्भात विभागप्रमुखांनी दिलेल्या विनंती अर्जाबाबत निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७२**

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

१०) बी.ए. सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमात सुचविलेल्या बदलासंदर्भात विचार करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७३**

संबंधित विभागाने BOS च्या मान्यतेनंतर प्रस्ताव विद्वान मंडळाकडे पाठवावा.

११) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये थेट द्वितीय वर्ष बी.कॉम. अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांकडून विचारणा होत आहे. त्याबाबत विचार करून निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७४**

संबंधित विभागाने BOS च्या मान्यतेनंतर प्रस्ताव विद्वान मंडळाकडे पाठवावा.

१२) विद्यापीठाद्वारे चालविल्या जाणाऱ्या बी.ए. (सामाजिकशास्त्रे/योग) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थांसाठी मे २०१६ ही शेवटची संधी होती. परंतु जे विद्यार्थी या परीक्षेला बसू शकले नाहीत व ज्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करावयाचा आहे त्यांना डिसेंबर २०१६ मधे परीक्षेला बसण्याची संधी देण्याबाबत विभागप्रमुखांनी दिलेल्या विनंतीअर्जाबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७५**

प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

१३) बी.ए.एल.एल.बी या पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशार्थी विद्यार्थ्यांना दोन पदव्या देणेबाबत विनंतीअर्जाचा विचार करणे व शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधे बी.ए.एल.एल.बी. या पाच वर्षाच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांच्या Passing Criteria संदर्भात निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७६**

Bar Council च्या नियमांच्या अधिन राहून पुढील निर्णय घेण्यात यावा. या संदर्भातील सर्व अधिकार मा. कुलगुरू यांना देण्याचे मान्य करण्यात आले.

१४) डॉ. रमेश उन्नीकृष्णन यांनी इंटरडिसिप्लिनरी सायन्स या विषयात दुसरी पी.एच.डी. करण्यास केलेल्या विनंती अर्जाचा विचार करणे व निर्णय घेणे बाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७७**

विनंती अर्जास मान्यता देण्यात आली.

१५) श्री. कमल किशोर यांनी इंटरडिसिप्लिनरी सायन्स या विषयात पी.एच.डी. करण्यास केलेल्या विनंती अर्जाचा विचार करणे व निर्णय घेणे बाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७८**

विनंती अर्जास मान्यता देण्यात आली.

१६) विद्यापीठामार्फत २०१६-१७ पासून D.Lit / D.Sc. पोस्ट डॉक्टोरल फेलो बाबतची नियमावली BOE ने तयार केली असून त्याला मान्यता देणे व अभ्यासक्रम सुरू करणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१७९**

प्रस्तावास मान्यता देण्यात आली. (सोबत माहितीसाठी नियमावली जोडत आहे).

१७) संस्कृत, नेहरू सामाजिक शास्त्र विभाग व आयुर्वेद या विभागांच्या शासनमान्य शिक्षक पदांच्या फेररचनेबाबत विचार.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८०**

महाराष्ट्र शासनाच्या दि.२९ मे १९९२ चा शासननिर्णय क्र. टिमवी १०९२/[१९८३]/विशि-१ व दि.२६ जून १९९६ चा शासननिर्णय क्र. टिमवी १०९०/[१७१९]/विशि-१ नुसार वरील तीन विभागांना मिळून १७ शिक्षकीय पदे मंजूर केली होती. यामधे नेहरू सामाजिक शास्त्र विभागास २ प्राध्यापक, ३ प्र-पाठक व ६ अधिव्याख्याता, संस्कृत विभागास १ प्राध्यापक, १ प्र-पाठक, २ अधिव्याख्याता तसेच आयुर्वेद विभागास १ अधिव्याख्याता (कोणत्याही विभागासाठी) व १ प्र-पाठक याप्रमाणे पदांचे विवरण होते.

नोव्हेंबर २०१५ च्या NAAC च्या अहवालानुसार संस्कृत / Indology व आयुर्वेद हे २ विभाग केंन्द्रशासनाच्या Centre of Excellence या योजनेसाठी प्रस्ताव सादर करू शकतात व NAAC च्या या व इतर निर्णयांवर मा. सर्वोच्च न्यायालयाने पण शिक्कामोर्तब केले आहे. तसेच आयुर्वेद महाविद्यालयाचा प्रस्ताव सुद्धा सादर करावयाचा अहे. विभागातील एकूण संशोधन व इतर बाबींचा विचार करून नेहरू सामाजिक शास्त्र विभागातील २ पैकी १ प्राध्यापक पद हे आयुर्वेद विभागाकडे वर्ग करावे व तसा प्रस्ताव तात्काळ राज्याशासनास मान्यतेसाठी सादर करावा.

पूर्वीपासूनच संस्कृत विभाग हा संस्कृत व भारतीय प्राच्यविद्या विभाग असा ओळखला जातो. अशा आशयाच्या कागदपत्रांची दप्तरी नोंद आहे. त्यामुळे संस्कृत विभागासाठीच्या १ प्र-पाठक या पदाऐवजी हे पद संस्कृत व प्राच्यविद्या विभाग प्र-पाठक अशा नावाने मान्य करून घ्यावे व तशा आशयाची जाहिरात प्रसिद्ध करावी.

तसेच मा. सहाय्यक आयुक्त, विषेश मागासवर्गीय कक्ष, पुणे यांनी नेहरू सामाजिक शास्त्र विभागातील ११ पदांचे विवरण १०० रू.च्या स्टँप पेपर वर मागितले आहे. सदर पदांचे विवरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| **विभाग** | **पद** | | |
|---|---|---|---|
| | प्राध्यापक | प्र-पाठक | अधिव्याख्याता |
| अर्थशास्त्र | १ | १ | २ |
| समाजशास्त्र | १ | १ | १ |
| इतिहास | - | १ | १ |
| राज्यशास्त्र | - | - | २ |
| **एकूण** | **२** | **३** | **६** |

तसेच संस्कृत विभाग १ प्राध्यापक व २ अधिव्याख्याता, संस्कृत व भारतीय प्राच्यविद्या - १ प्रपाठक तसेच आयुर्वेद विभाग १ प्र-पाठक व १ अधिव्याख्याता.

वरील १७ शासकीय शिक्षकीय पदांच्या पुर्नरचनेला मान्यता देण्यात आली.

१८) पंडीत खामकर यांच्या विनाअर्ज अनियमित उपस्थिती याबाबत त्यांना समज देणे व आत्तापर्यंत मागील ३ वर्षातील त्यांच्या अनुपस्थितीबद्दल निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८२**

पंडीत खामकर यांच्या विनाअर्ज अनियमित उपस्थिती बाबत त्यांना लेखी समज देण्यात यावी. याबाबत पुढील निर्णय घेण्याचे अधिकार प्र.कुलसचिव यांना देण्यास मान्यता देण्यात आली.

१९) या महिन्यात येणाऱ्या दिवाळीसाठी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याविषयी मा. कुलगुरूंना सर्वाधिकार देण्यात येण्याबद्दल.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८३**

मा. कुलगुरूंना वरील संदर्भात सर्वाधिकार देण्यास मान्यता देण्यात आली.

**मा. अध्यक्षांच्या संमतीने आयत्या वेळेचे विषय.**

२०) डॉ. श्रीपाद भट व डॉ. प्रविण जाधव यांना ६ व्या वेतन आयोगाच्या पोटी अनुक्रमे रू. २०,०००/- व रू.८,०००/- विद्यापीठ निधीतून देण्यात येत होते (शासन निर्णयाच्या अधिन राहून). सदर रक्कम परत नियमाप्रमाणे त्यांच्याकडून घेता यावी याबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८४**

विद्यापीठाने ६ व्या वेतन आयोगापोटी शासन नियमांच्या अधिन राहून डॉ. श्रीपाद भट व डॉ. प्रविण जाधव यांना दरमहा रू.२०,०००/- (रू. वीस हजार) व रू. ८,०००/- (रू. आठ हजार) अशी रक्कम देऊ केली होती. आजमिती अखेर शासनाचा याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. ऑगस्ट २०१६ पर्यंत डॉ. श्रीपाद भट यांना रू ११,४४,०००/- (रू अकरा लाख चव्वेचाळीस हजार) व डॉ. प्रविण जाधव यांना रू.४,६४,०००/- (रू. चार लाख चौसष्ठ हजार) विद्यापीठ निधीतून देण्यात आलेले आहेत. तरी सदर रकमेचा परतावा वित्त विभागाने त्यांच्याकडून घ्यावा. ऑक्टोबर २०१६ पासून डॉ. श्रीपाद भट व डॉ. प्रविण जाधव यांच्या पगारातून अनुक्रमे रू.२०,०००/- (रू.वीस हजार) व रू.१०,०००/- (रू. दहा हजार) रक्कम पूर्ण होईपर्यंत, वजा करण्यात यावेत. हा परतावा करून घेण्याची संपूर्ण जबाबदारी मुख्यलेखापाल यांच्यावर राहील.

२१) C.B.S.E. pattern च्या शाळेची परवानगी विद्यापीठ न्यासास प्राप्त झाली आहे. त्याचा मान्यता क्रमांक लवकरच प्राप्त होईल. तरी शाळा सुरू करण्यास मान्यतेसाठी व न्यासाने इमारत व इतरबाबींची पूर्तता करणेबाबत प्रस्ताव.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८५**

सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

२२) श्री. रघुनाथ निकम यांच्या पी.एच.डी - क्लासिकल डान्स या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८६**

प्रस्ताव नामंजूर करण्यात आला.

२३) पी.एच.डी/एम.फिल विद्यार्थी (लायब्ररी सायन्स) यांच्या रिॲलोकेशनबाबत प्रस्ताव.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८७**

पी.एच.डी/एम.फिल विद्यार्थी (लायब्ररी सायन्स) यांच्या रिॲलोकेशनबाबत प्रस्ताव BOS कडून सादर करण्यात यावा.

२४) श्री.योगेश लांडगे व श्री. राजेश हिले यांनी त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीसबाबत केलेल्या खुलाश्याबाबत माहिती देणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८८**

श्री.योगेश लांडगे व श्री. राजेश हिले यांनी दिलेले खुलासे मा. कुलपती महोदयांच्या अवलोकनार्थ सादर करावे व त्यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील दिशा ठरवावी. याबाबतची संपूर्ण जबाबदारी प्र.कुलसचिव यांची राहील.

सही/-डॉ. अभिजीत जोशी
प्रभारी कुलसचिव

सही/- डॉ. दीपक ज. टिळक
अध्यक्ष